गांवकरी आज
बुधवार
दि. १३ एप्रिल २०१६

# आगरटाकळीत श्रीरामनवमीपासून व्याख्यानमालेचे आयोजन

। नाशिक । वार्ताहर ।

आगरटाकळी येथील श्री मारुती देवस्थान आणि राष्ट्रसंत श्री समर्थ रामदास स्वामी मठातर्फे दि. १५ ते २२ दरम्यान व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता जिल्हा व सत्र न्यायाधिश ए.एम. ढवळे यांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उद्‌घाटन होईल. अशी माहिती विश्वस्त ज्योतीराव खैरनार व सुधीर शिरवाडकर यांनी दिली.

श्रीराम नवमी ते हनुमानजयंती दरम्यान ही व्याख्यानमाला दररोज सायंकाळी सहा वाजता होणार आहे. दि. १५ रोजी प्रकाश पाठक 'जगी सर्व सुखी असा कोण आहे?' दि. १६ रोजी सदानंद मोरे - संत साहित्य आणि आपण' दि. १७ रोजी यशवंत पाठक 'उत्कट तेची घ्यावे' दि. १८ रोजी कॅप्टन अतुल इंदुलकर - 'गुरु पंपरा व नामाचे महात्म्य' दि. १९ रोजी श्री सच्चिदानंद कानेटकर 'जय जय रघुवीर समर्थन', दि. २० रोजी संजय गोडबोले 'मानवी जीवनात धर्माची आवश्यकता' दि. २१ रोजी ऋतुजाताई वाळिंबे - श्री हनुमान चरित्र' ही व्याख्याने होतील. प्रमुख पाहुणे म्हणून भालचंद्र पिंपळवाडकर, श्रीमंत माने, चंदुलाल शहा तसेच शिक्षणतज्ज्ञ सूर्यकांत रहाळकर, डॉ. राम कुलकर्णी उपस्थित राहणार आहेत.

सर्वांनी व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा असे आवाहन विश्वस्त प्रकाश पवार, दिलीप कैचे, विजया माहेश्वरी आणि अध्यक्ष एन. के. ब्रह्मे यांनी केले आहे. शुक्रवार दि. १५ दुपारी १२ वाजता श्रीराम जन्मोत्सव सोहळा होईल. शुक्रवारी दि. २२ रोजी हनुमान जयंतीनिमित्त चैत्र पौर्णिमेला सकाळी सूर्योदयाच्यावेळी ६ वाजून १९ मिनिटांनी जन्मोत्सव कार्यक्रम होईल. सकाळी ९ वाजता डॉ. राजेंद्र मुळे यांचे 'भिमरुपी महारुद्रा' हे व्याख्यान होईल. सकाळी १० ते १२ या वेळेत स्वामी जोमानंद महाराज (खामगाव) यांचे 'जीवन देवाचे आचरण माणसाचे' या विपयावर व्याख्यान होणार आहे. दुपारी १२ वाजता आरती व नंतर अग्रवाल परिवारातर्फे महाप्रसाद वितरण होईल. दुपारी ४ वाजता भक्तीगीतांचा कार्यक्रम व त्यानंतर ऋतुजा वाळिंबे यांचे 'हनुमान चरित्र' या विपयावर व्याख्यान होईल. यावेळी अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.